# जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in


**प्रेसनोट क्र.३०४९** **दि. २१/०९/२०१९**

## चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर
## हरवलेला मोबाईल मालकास परत मिळवुन दिले बाबत.

चंदननगर पो. स्टे. चे हद्दीमध्ये राहाणारे श्री. खुटे, रा. पठारे वस्ती, खराडी, पुणे, हे दिनांक २१/०९/१९ रोजी सकाळी १०.०० वा. चे सुमारास त्यांचे मोटार सायकलवरुन जात असतांना त्यांचा मोबाईल हँडसेट रेडमी नोट – ५ प्रो हा रिलायंन्स मॉलचे जवळ रोडवर पडुन गहाळ झालेला होता.

सदरचा मोबाईल हँडसेट इसम नामे श्री. राजु धारीया, रा. मुंढवा, पुणे, यांना मिळुन आल्याने त्यांनी सदरचा मोबाईल हँडसेट पोलीस ठाणेचे ठाणे अमलदार सपोनि. टापरे व सेवाचे कर्मचारी मपोना. १३५२, सिमा वळवी यांचेकडे जमा केला होता.

मोबाईल हँडसेट मालक श्री. बापुसाहेब खुटे, रा. पठारे वस्ती, खराडी, पुणे हे त्यांचा मोबाईल गहाळ झालेबाबत तक्रार देणेसाठी पोलीस ठाणे मध्ये सकाळी ११.०० वा. चे सुमारास हजर झाले व त्यांनी सदर मोबाईलचे वर्णन सांगितलेने त्यांचेकडे खात्री करुन वरील मिळालेला मोबाईल हँडसेट त्यांचाच असल्याचे निष्पन्न झालेने त्यांचा मोबाईल हँडसेट रेडमी नोट -५ प्रो हा पोलीस ठाणे येथे सपोनि. टापरे व सेवाचे कर्मचारी मपोना. १३५२, सिमा वळवी यांनी त्यांचे ताब्यात दिलेला आहे.

मोबाईल हँडसेट मालक श्री. बापुसाहेब खुटे यांना त्यांचा मोबाईल हँडसेट ताब्यात मिळाल्याने त्यांना खुप आनंद होवुन, त्यांनी पोलीसांचे आभार मानुन, कौतुक केले आहे.

